सकाळ

# जगण्याचा संघर्ष म्हणजे अण्णा भाऊ

## डॉ. विश्वनाथ शिंदे : 'स्वारातीम' विद्यापीठात व्याख्यान



**नवीन नांदेड : 'स्वारातीम' विद्यापीठात साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यानात बोलताना डॉ. विश्वनाथ शिंदे. या वेळी कुलगुरू डॉ. उद्धव भोसले अन्य.**

**नवीन नांदेड, ता. १ (बातमीदार) :** 'कथा, कादंबऱ्या, लोकनाट्य आणि आपल्या समग्र लेखनातून अण्णा भाऊ साठे यांनी मानवी जगण्यातलं वास्तव, जगण्याचा, भुकेचा संघर्ष त्यांनी अधोरेखित केला. उपेक्षित,वंचित, दुर्लक्षित माणूस त्यांच्या लेखनाच्या केंद्रस्थानी होता. त्यांनी जे जे लिहिलं ते त्यांच्या अनुभवाची अभिव्यक्ती होती. समाजक्रांतीचं शस्त्र घेऊन लढणारे अण्णा भाऊ साठे हे नेहमी समाजातील उपेक्षित घटकांच्या बाजूने उभे राहिले. नामवंत लेखकांपेक्षा त्यांचा वाचकवर्ग कित्येक पटीने मोठा होता. कारण अण्णा भाऊ साठे हे केवळ लोकशाहीर नव्हते; तर ते श्रेष्ठ दर्जाचे मानवतावादी लेखक होते, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील महात्मा फुले अध्यासनाचे संचालक आणि अभ्यासक डॉ. विश्वनाथ शिंदे यांनी केले.

साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. उद्धव भोसले होते. या वेळी प्र. कुलसचिव डॉ. रमजान मुलाणी, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. रवी सरोदे, मराठी विभागप्रमुख डॉ. केशव सखाराम देशमुख, अध्यासनाचे समन्वयक डॉ. पी. विठ्ठल, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. ज्ञानोबा मुंढे उपस्थित होते.

डॉ. शिंदे म्हणाले, "अण्णा भाऊंची समीक्षकांनी मोठी उपेक्षा केली. त्यांच्या लेखनाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. त्यांचे लेखन साहित्य बाह्य प्रेरणेवर आधारलेले आहे. अशी टीकाही झाली; पण आज अण्णा भाऊ साठे यांचे लेखन अनेक भाषांमध्ये अनुवादित होत आहे. त्यांची विचारांची प्रासंगिकता अधोरेखित होत आहे."

कुलगुरू डॉ. उद्धव भोसले म्हणाले, "अण्णा भाऊ साठे यांच्यासारख्या महान लेखकांचे विचार समाजात रुजणे ही काळाची गरज आहे." डॉ. पी. विठ्ठल यांनी प्रास्ताविक केले; तर डॉ. अविनाश कदम यांनी सूत्रसंचालन केले आणि डॉ. ज्ञानोबा मुंढे यांनी आभार मानले.